करमाळा तालुक्याचे लोकप्रिय मुखपत्र...
साप्ताहिक कमलाभवानी
# संदेश
वर्षे 34 वे
www.saptahiksandesh.com

संस्थापक संपादक
डॉ.ॲड.बाबूराव हिरडे
संपादक
सौ.उषादेवी बाबूराव हिरडे
वेताळ पेठ, करमाळा, जि.सोलापूर
मो.९४२३३३७४८०

Shweta Gift & Toys
लहान मुला-मुलींसाठी सर्व प्रकारच्या खेळणी व भेटवस्तू उपलब्ध !
श्रीराम मंदिर शेजारी,वेताळपेठ, करमाळा. (9822058106 / 9096416076)

रजि नं.७०४९७/९८ (दिल्ली) | पोस्ट परवाना PPR/01/2021-2023 | वर्षे ३४ वे | अंक क्र.४४ | पाने-१२ | दि.१५/११/२०२४ | दर शुक्रवारी प्रसिध्द | किंमत - ४ रू.

## करमाळा विधानसभा

# प्रचाराची रंगत वाढली - संयमात पण उत्साहात सभांची रेलचेल

करमाळा : करमाळा विधानसभा मतदार संघातील प्रचार शिगेला पोहचला असून, दर दिवशी नवनवी रंगत अनुभवण्यास येत आहे. चौरंगी लढतीत दररोज प्रत्येक उमेदवाराच्या जोरदार सभा होत आहेत. विशेष म्हणजे या सभेत टिका टिपण्णी होत असतानाही, या सभा शांततेत व उत्साहात सुरू आहेत. बहुतेक उमेदवारांच्या पदयात्रा, कॉर्नर सभा व घराघरात भेटीचा उपक्रम जोरदार चालू आहे. चौरंगी लढतीत १९ नोंव्हेबरची रात्र अत्यंत महत्वाची असून ती रात्रच उमेदवारांचे भवितव्य ठरवणार आहे.

करमाळा मतदार संघात एकूण १५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्यामध्ये चौरंगी लढत होत आहे. महायुतीचे उमेदवार दिग्विजय बागल, महविकास आघाडीचे उमेदवार माजी आमदार नारायण






आबा पाटील, अपक्ष उमेदवार विद्यमान आमदार संजयमामा शिंदे व अपक्ष उमेदवार प्रा.रामदास झोळ अशी चौरंगी लढत होत आहे. या चौरंगी लढतीत शह-कटशहचे राजकारण केले जात आहे. माजी आमदार पाटील यांनी माजी आमदार जयवंतराव जगताप तसेच शहरातील सावंत परिवार तसेच वीटचे राजेंद्रसिंह राजेभोसले, कंदरचे भास्कर भांगे, राष्ट्रवादीचे संतोष वारे यांचा पाठींबा मिळवून प्रचार गतीमान केला आहे. याशिवाय राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री लक्ष्मणराव ढोबळे, माजी आमदार जयवंतराव जगताप यांच्या सभा तसेच राष्ट्रवादीचे संस्थापक शरद पवार यांची सभा होणार आहे. अशा प्रकारे त्यांनी प्रचारात रंगत आणण्याचे काम केले आहे.

त्याला शह देत आमदार संजयमामा शिंदे यांनी माढा तालुक्यातील अतुल खुपसेसह अन्य अपक्ष उमेदवारांचे अर्ज काढून घेण्यात यश मिळवले आहे. त्याशिवाय जगताप गटाचे कंदर येथील अण्णा पवार, माजी उपसरपंच जाधव, रावगाव येथील माजी सरपंच दादासाहेब जाधव, केम येथील पारखे परिवार यांच्यासह बागल गटाचे कंदरचे आदिनाथचे माजी उपाध्यक्ष नानासाहेब लोकरे, करमाळा शहरातील भाजपाचे जिल्हा सरचिटणीस गणेश चिवटे व त्यांचे सहकारी, आरपीआयचे नागेश कांबळे यांना आपल्या बरोबर घेऊन बेरजेचे राजकारण केले आहे. याशिवाय गावागावात जोडलेले कार्यकर्तेपक्के करत, नव्या परिवाराला जोडण्याचे काम करत प्रचारात रंगत आणली आहे.

दिग्विजय बागल यांची निवडणुकीत उशीरा एन्ट्री झाली; पण त्यांनी प्रचारात आघाडी तर घेतलीच पण जुना बागल गट त्यांनी संघटीत करून प्रचारात रंगत मिळवली. याशिवाय शिवसेनेचे जिल्हा प्रमुख (पान २ वर)

॥ श्री गजानन प्रसन्न ॥ श्री साईबाबा प्रसन्न ॥
॥ श्री भैरवनाथ प्रसन्न ॥ श्री कमलादेवी प्रसन्न ॥

चि.गौरव B.E.Civil
कै.अनंतराव (आबा) कोंडीबा सावंत यांचे नातू व
श्री.विठ्ठलराव अनंतराव सावंत रा.करमाळा, जि.सोलापूर
यांचे कनिष्ठ सुपुत्र

चि.सौ.कां.तन्वी
श्री.कल्याणराव यशवंत मुरूमकर(पाटील) यांची नात व
श्री.गणेश कल्याणराव मुरूमकर रा.बिटरगाव (श्री)
ता.करमाळा, जि.सोलापूर यांची जेष्ठ सुकन्या

यांचा शुभविवाह

रविवार दि.१७/११/२०२४ रोजी सायं ६ वा. १५ मि.
या गोरज मुहूर्तावर करण्याचे योजिले आहे. या शुभमंगलप्रसंगी
आपण सहकुटूंब-सहपरिवार अगत्याने उपस्थित राहून
वधु-वरांस शुभाशिर्वाद द्यावेत; ही नम्र विनंती !

॥ सस्नेह निमंत्रण ॥

आशिर्वाद

आशिर्वाद

आशिर्वाद


• विवाहस्थळ •
सावंत फार्म हाऊस
जामखेड रोड, बायपास चौक
करमाळा, जि.सोलापूर
• विवाह वेळ •
६ वा.१५ मि.

• आपले नम्र •
श्री.गोपाळराव अनंतराव सावंत श्री.भगवानराव अनंतराव सावंत
श्री.दादासाहेब अनंतराव सावंत श्री.विठ्ठलराव अनंतराव सावंत
ॲड.राहुल सुभाषराव सावंत

सावंत परिवार, करमाळा.

टीप : सर्वांना निमंत्रण पत्रिका पाठविलेली आहे. नजरचुकीने कोणास मिळाली नसल्यास हेच निमंत्रण समजून शुभकार्यास अगत्य यावे, ही नम्र विनंती !

राजकारण म्हणजे विकास कामातील शस्त्र आहे. ते नेमके कोणाच्या हाती द्यायचे हे मतदाराच्या हाती आहे..!

## संपादकीय.........................................!

# उमेदवाराची नव्हे, मतदारांची कसोटी..!

एक दिवस 'उनाड' हा चित्रपट तसा मजेशीर आहेच; पण उद्‌बोधन करणाराही आहे. यामध्ये अशोक सराफ एक दिवस आपले वैभव सोडून रस्त्यावर चालत असतो. त्यावेळी त्याला रस्त्यावर एक पोपटाव्दारे भविष्य सांगणारा माणूस भेटला. तो त्या माणसाला म्हणतो, 'या पोपटाचे काय पैसे असतील ते पैसे घे, त्याला सोडून दे..!' त्यावेळी तो म्हणाला, 'दादा या पोपटाला मी नाही सोडू शकत, कारण मी या पोपटाला सांभाळत नाहीतर तो पोपटच मला सांभाळतो.' समाजात ज्याला समजते त्यालाच समजते, की मोठा कोण व छोटा कोण..? लोकशाहीमध्ये निवडणुकीला अनेकजण उभे असतात पण बहुतेकांना वाटते की मी मोठा, मी पैसेवाला, मी समाजात सहकारी व्यवसाय उभा केलेला, माझी मोठमोठ्या नेत्याशी जवळीक आहे, शासन दरबारी माझे वजन मोठे मग मीच सर्वश्रेष्ठ असा विचार करणारे अनेकजण आहेत. बहुतेक स्वत:ला मोठे समजणारेच लोक निवडणुकीत उभे असतात. पण निवडणुकीत कोण उभा आहे, हे महत्वाचे नाहीतर जो मत देवून निवडून आणतो तो मतदार महत्वाचा आहे.

सध्या करमाळा मतदार संघात मतदारांची मोठी जबाबदारी वाढली आहे. निवडणुकीला पंधराजण उभे असलेतरी खरी लढत चौरंगी आहे. या रणमैदानात विद्यमान अपक्ष आमदार संजयमामा शिंदे, महाविकास आघाडीकडून उभे असलेले माजी आमदार नारायण पाटील,महायुतीकडून उभे असलेले बागल गटाचे युवा नेते दिग्विजय बागल व अपक्ष उमेदवार प्रा.रामदास झोळ अशी या चौघात लढत होत आहे. या चौघापैकी आमदार शिंदे व माजी आमदार पाटील हे दोघे मुरब्बी राजकारणी आहेत . या दोघा उमेदवारांना सत्तेचा अनुभव आहे. माजी आ.पाटील हे सन २०१४ ते २०१९ या कालावधीत आमदार होते तसेच ते पंचायत समिती, बाजार समिती, जिल्हा परिषद, आदिनाथ आदी सत्ता क्षेत्रात कार्यरत होते. आ.शिंदे सन २०१९ पासून आमदार आहेत. याशिवाय जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष पद, अध्यक्ष पद, जिल्हा बँकेचे अध्यक्ष पद, पंचायत समिती सभापती पासून बाजार समिती सभापती पर्यंत तसेच साखर कारखानदारीचे ते निर्माते आहेत.

दिग्विजय बागल व प्रा. रामदास झोळ हे प्रथमच विधानसभा निवडणुक लढवत आहेत. श्री.बागल हे मकाई कारखान्याचे चेअरमन होते, बाजार समितीचे संचालक होते. याबरोबरच बागल गटाकडे पंचायत समिती व इतर सत्ता असताना त्याचे कामकाज त्यांनी जवळून अनुभवले आहे. प्रा.झोळ यांना शिक्षण क्षेत्रातील मोठा अनुभव आहे. खुप लहान वयात त्यांनी धाडसाने दत्तकला शिक्षण संस्था स्थापन केली आहे. याबरोबरच त्यांनी गावच्या निवडणुकीपासून जिल्हा परिषद, मकाई कारखाना निवडणुकीचा अनुभव घेतलेला आहे. मराठा आरक्षण आंदोलनात त्यांनी सुरवातीपासून भाग घेतला आहे. अलीकडच्या काळात तालुक्यातील विविध आंदोलनात त्यांनी सहभाग घेतलेला आहे. चौघेही उमेदवार हे प्रशासन व राजकारणात कसलेले उमेदवार आहेत. त्यांचा मतदाराशी दांडगा संपर्क आहे, राजकारणासाठी आवश्यक असलेली संभाषण कलाही चांगली असून तालुक्यातील समस्या माहित आहेत, त्या कशा सोडवायच्या याचीही जाण आहे. त्याबरोबरच मतदारसंघातील गावागावातील कार्यकर्ते कोण, आपले कोण, दुसऱ्याचे कोण याचे ज्ञान आहे. त्याप्रमाणे प्रत्येक गावातील बलस्थाने, रखडलेली कामे याचाही अभ्यास असून विरोधकाचे कच्चे दुवे कोणते, त्यांना नेमके कोणाचे पाठबळ आहे, याचा अंदाज आहे. त्यामुळे या निवडणुकीत शहला प्रतिशह देत या चौघांनी एकमेकाविरूध्द शंख फुकले आहे. या निवडणुकीत थोडा जरी अंदाज चुकला किंवा एखादा निर्णय जरी चुकला तर त्याची मोठी शिक्षा सहन करावी लागते. अर्थातच या राजकारणाच्या डावपेचामुळेच विद्यमान आमदार अपक्ष उमेदवार म्हणून उभे राहिलेले आहेत.

या निवडणुकीचा मागोवा घेतला असता, उमेदवारीसाठी येथे पक्षांतरे झालेली आहेत. लोकसभेला नारायण आबा हे शिवसेनेतून राष्ट्रवादीत गेले तर उमेदवारी अर्ज भरण्याच्यावेळी दिग्विजय बागल हे भाजपातून शिवसेनेत गेले. मागील निवडणुकीवेळी रश्मी बागल या ऐनवेळी राष्ट्रवादीतून शिवसेनेत गेल्या होत्या, त्याचा तोटा झाला पण यावेळी श्री.बागल ऐनवेळी भाजपातून शिवसेनेत गेले त्याचा त्यांना नक्की फायदा झाला आहे. त्यांना शिवसेना पक्षाचे पाठबळ, लाडकी बहिणीचा आशिर्वाद आणि एकसंघ झालेल्या बागल गटाचा फायदा मिळत आहे.

दुसऱ्या बाजुला माजी आमदार पाटील यांना राष्ट्रवादीची उमेदवारी मिळाल्यामुळे ते प्लस मध्ये आले आहेत. राज्यात महायुतीवर मतदार नाराज आहेत, त्याचा फायदा तसेच शरद पवार यांना मिळणारी सहानुभुतीचाही त्यांना फायदा आहे. याबरोबरच मराठा, मुस्लीम, ओबीसी यांचे मिळणारे पाठबळ फायद्याचे आहे तर सध्या जयवंतराव जगताप हे नारायण आबाचे स्टार प्रचारक असून त्यांच्या सभांना मोठी गर्दी होत आहे. सध्या बागल व शिंदे यांच्यावर ते सडकून टिका करत आहेत. शिवाय जगताप यांच्या गटाचाही त्यांना मोठा फायदा झालेला दिसत आहे.

दरम्यान राष्ट्रवादी अजित पवार गटाची उमेदवारी संजयमामा यांना हमखास असताना त्यांनी ती उमेदवारी नाकारून अपक्ष निवडणुक लढवण्याचे ठरवले. महायुतीची उमेदवारी नाकारल्यामुळे करमाळ्यातून महायुतीचे बागल उभे राहिले पर्यायाने करमाळा तालुक्यातील मताच्या विभाजनाचा फायदा श्री.शिंदे यांना मिळत आहे. याशिवाय तालुक्यातील जोडलेले कार्यकर्ते व पुन्हा नव्याने आलेले कार्यकर्ते व ३६ गावातील एकगठ्ठा मतदान या जोरावर त्यांनी मोठी आघाडी घेतली आहे.

प्रा.झोळ यांनी वेगवेगळ्या मार्गातून मतदारापर्यंत पोहचण्याचे काम केले आहे. देवदर्शन असो, की विद्यार्थी प्रश्न असो की मराठा आरक्षण असो, की मकाईचा लढा असो यातून ते सर्वसामान्यापर्यंत पोहोचले आहेत. याशिवाय दशरथराव कांबळे सारखे स्टार प्रचारक त्यांच्या सोबत आहेत. कांबळे आपल्या सभेत विरोधी तिघा उमेदवारांची खिल्ली उडवून कोऱ्या पाटीचे प्रा.झोळ यांना का निवडून द्यायचे हे मतदाराला पटवून देत आहेत.

एकंदरीत या निवडणुकीत चौरंगी लढतीत सर्वांचेच पारडे जड वाटत आहे. त्यात तिघामध्ये चुरस जाणवते तर दोघात घासून लढत होत असल्याचे बोलले जात आहे. प्रत्येक उमेदवार व त्यांच्या प्रचारकाला यशाची खात्री आहे, पण कोणीतरी एकच निवडून येणार ना..? म्हणजे मतदार उमेदवार कोण कसा व कोणाला संधी दिली पाहिजे; याचा विचार करून मतदान करेल तरच चांगला व लायक उमेदवार तालुक्याला मिळणार आहे. डोळे झाकून मतदार न करता डोळे उघडे ठेवून मतदान करण्याची गरज आहे. एक वेळ चुकली की पाच वर्षे वाट पहावी लागते. त्यामुळेच खरी कसोटी उमेदवाराची नसून मतदारांची आहे. यापुर्वी मतदारांनी आपले श्रेष्ठत्व सिध्द केले आहे. यावेळी त्या सिध्दतेला पात्र ठरतील का..? याचे उत्तर २३ नोव्हेंबरला समजेल..!

पान १ वरून पुढे...

## प्रचाराची रंगत वाढली - संयमात पण उत्साहात सभांची रेलचेल

महेश चिवटे व त्यांचे सहकारी तसेच भाजपाचे दिपक चव्हाण, नरेंद्रसिंह ठाकूर, शाम सिंधी असे प्रचारक त्यांचा सोबत आहेत. बागल गटाचे मार्गदर्शक विलासराव घुमरे यांच्या मार्गदर्शनाखाली गटाचे संघटनाचा फायदा त्यांना प्रचारात होत आहे. याशिवाय लाडकी बहिण योजनेचे पाठबळ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उद्योग मंत्री उदय सामंत यांच्या सभा यामुळे बागल यांनी प्रचारात रंगत आणली आहे.

चौथे अपक्ष उमेदवार प्रा.रामदास झोळ यांनी निवडणूक जाहीर होण्याच्या अगोदर एक वर्षापासून जोरदार तयारी केली होती. त्यानुसार त्यांनी मराठा आरक्षण आंदोलनात सहभाग दर्शवला होता. मनोजदादा जरांगे यांच्या सोबत त्यांनी मराठा कार्यकर्तेजोडले आहेत. मकाई कारखाना निवडणुक, ऊस बीलासाठी केलेले आंदोलन यातून अनेक कार्यकर्तेजोडले आहेत. याशिवाय नवरात्र महोत्सवात त्यांनी प्रत्येक गावातून शेकडो महिलांना देवदर्शन घडवले आहे. याशिवाय दत्तकला शिक्षण संस्थेतून करमाळा तालुक्यातील शेकडो विद्यार्थी सवलतीच्या दरात शिक्षण घेतलेले आहेत. त्यांचे पालक त्यांचे सोबत आहेत. शेतकरी संघर्ष समितीचे नेते दशरथराव कांबळे यांच्या सारखी वक्तृत्वाची बुलंद तोफ त्यांच्या सोबत आहे. मोठ्या गावात सभा व घरा-घरात प्रचार यातून त्यांनी प्रचारात मोठी रंगत आणलेली आहे.

अशा प्रकारे संपुर्ण मतदार संघात चौघांनी प्रचारात जोर लावला आहे. विशेष म्हणजे या सर्व प्रचारात एकमेकांविरूध्द कडवी टिका केली जात आहे. तरीही प्रचार संयमात आणि उत्साहात सुरू आहे. असे असलेतरी या निवडणुकीत महत्वाची १९ नोंव्हेंबरची रात्र महत्वाची ठरणार आहे. ती रात्र ज्याच्या दृष्टीने अर्थपूर्ण त्याचा यशाचा मार्ग सुकर होण्याची शक्यता आहे.

सा.कमलाभवानी संदेश हे साप्ताहिक प्रकाशक, मालक, मुद्रक सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी संदेश प्रिंटर्स, वेताळपेठ, करमाळा येथे संपादक म्हणून सौ.उषादेवी बाबूराव हिरडे यांनी छापून तेथेच प्रसिध्द केले. (या अंकातील मजुकराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

आरामदायक व सुखकर प्रवासासाठी एकच नांव...



# जय बजरंगबली टूर्स & ट्रॅव्हल्स् पोंधवडी, ता.करमाळा.

● **नेपाळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी) वाराणसी, गोरखपूर, प्रयागराज, काठमांडू, मनोकामना, लुंबिनी, अयोध्या, पोखरा

● **काशी दर्शन** काशी, गया, आयोध्या, प्रयाग

● **गुजरात दर्शन** — गिरनार पर्वत, जुनागड, सोरटी सोमनाथ नागेश्वर ज्योर्तिलिंग, द्वारकाधाम, अक्षरधाम, स्टेयु ऑफ युनिटी, सरदार वल्लभभाई पटेल पुतळा
**कालावधी :** दि.३/१/२०२५ ते ११/१/२०२५
**सहल खर्च : रू.१४,०००**

● **कन्याकुमारी दर्शन** — कन्याकुमारी, त्रिवेंद्रम, मदुराई, रामेश्वरम्, तिरूपती बालाजी
**कालावधी :** दि.१६/१/२०२५ ते २६/१/२०२५
**सहल खर्च : रू.१३,८००**

● **गंगासागर दर्शन** — गंगासागर, कोलकत्ता, जगन्नाथ पुरी भुवनेश्वर, कोणार्क, साक्षी गोपाळ
**कालावधी :** दि.३०/१/२०२५ ते ७/२/२०२५
**सहल खर्च : रू.१२,८००**

● **केरळ दर्शन** (रेल्वे प्रवास ३ एसी) — कोचीन, अलेप्पी, थेकड्डी, मुन्नार त्रिवेंद्रम, कन्याकुमारी, मधुराई, रामेश्वरम्
**कालावधी :** दि.११/२/२०२५ ते २३/२/२०२५
**सहल खर्च : रू.३१,५००**

● **वैष्णोदेवी, कार्श्मिर, अमृतसर दर्शन** — माता वैष्णोदेवी, श्रीनगर, गुलमर्ग, सोनमर्ग, पेहलगाम, अमृतसर इ.
**कालावधी :** दि.२८/२/२०२५ ते १३/३/२०२५
**सहल खर्च रू.२६,०००**

● **वैष्णोदेवी दर्शन** — माता वैष्णोदेवी, शिवखोरी, जम्मू अमृतसर, अटारी बॉर्डर, दिल्ली
**कालावधी :** दि.९/३/२०२५ ते १७/३/२०२५
**सहल खर्च : रू.१३,८००**

● **मथुरा दर्शन** — मथुरा, आग्रा, गोकुळ, वृंदावन, बरसाना, गोवर्धन पर्वत, नंदगाव
**कालावधी :** दि.२२/३/२०२५ ते २८/३/२०२५
**सहल खर्च : रू.९,१००**

● रेल्वे प्रवास ● बस प्रवास
● भोजन व्यवस्था ● राहण्याची उत्तम सोय



संपर्क **श्री.मयुर राऊत**

**बुकींग सुरू**

मो.८८८८३३३६३८ / ८६९८३३३६३८

# करमाळा तालुक्याचा चेहरा-मोहरा बदलण्यासाठी जनतेने पुन्हा आमदार करून विकासकामे करण्याची संधी द्यावी : नारायण पाटील



करमाळा(सं.प्र.): २०१४ च्या निवडणुकीला तालुक्यातील जनतेने मला काठावर पास करून आमदार केलं. आमदार झाल्यानंतर मी तालुक्यातील अनेक रखडलेली कामे केलेली आहेत आणि त्याच कामावरती २०१९ च्या निवडणुकीत मला तालुक्यातून २५ हजार पेक्षा जास्त लीड मिळालेला होता. जयवंतराव भाऊ यांच्या पाठींब्याने मी निवडून येणार आहे व त्यांच्यासोबत मी या तालुक्याचा चेहरा मोहरा बदलणार आहे. त्यामुळे मला येत्या निवडणुकीत भरघोस मतांनी विजयी करा; महाविकास आघाडीचे उमेदवार माजी आमदार नारायण पाटील यांनी केले

विधानसभा निवडणुकीच्या प्रचारार्थ कंदर येथे आयोजित सभेत श्री.पाटील बोलत होते. पुढे बोलताना श्री.पाटील म्हणाले, की जयवंतराव जगताप यांनीच मला तालुक्याच्या राजकारणात आणलेले आहे. १९९२ ला मी जेऊरचा सरपंच झालो होतो. १९९३ ला करमाळा बाजार समितीची निवडणूक लागली होती. त्यावेळी जयवंतराव जगताप यांनी मला स्वत: बोलावून ग्रामपंचायत मतदारसंघातून फॉर्म भरायला लावला व बाजार समितीवर सभासद म्हणून मला निवडूनही आणले होते. मागील बाजार समितीच्या निवडणुकीच्या वेळेस जी बंडखोरी झाली, त्यामध्ये माझा कोणताही हस्तक्षेप नव्हता. आमच्यातीलच एक भांड होते ते निघून गेले, भाऊंना वाटले की हे आबांचे कारस्थान आहे. परंतु तालुक्याच्या राजकारणात तुम्ही मला आणलेलं आहे, हे लक्षात ठेवा. माझा स्वभाव, बापूंचा स्वभाव तुम्हाला माहित आहे. तालुक्याच्या राजकारणात तुमच्या बाबतीत मी एकही चूक केलेली नाही व भविष्यातही करणार नाही.

यावेळी माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी आपल्या भाषणामध्ये या संदर्भात बोलताना म्हणाले, की बाजार समिती निवडणुकीच्या वेळेस जी घटना झाली त्यानंतर आमच्यात मतभेद झाले होते. मला तो कोळसा परत काढायचा नाही. परंतु या सर्व गोष्टींना कंटाळून मी माढ्याचे पार्सल २०१९ च्या निवडणुकीसाठी आणले होते. परंतु आता हे पार्सल परत करण्याची वेळ आलेली आहे.

यावेळी पाटील व जगताप गटाचे कार्यकर्ते, कंदर ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डिस्काउंटच्या जमान्यामध्ये भव्य डिस्काउंटसह
**फ्रेश मटेरियलची हमी फक्त एव्हरफ्रेश सुपरमार्ट मध्येच !**

सर्व ब्रॅन्डेड वस्तूंच्या MRP वर भरघोस डिस्काउंट

## उपवासाचे पदार्थ

**रेडिमेड स्नॅक्स**

- खजुर (लाल व काळी)
- सिडलेस खजुर (लाल व काळी)
- राजगिरा लाडू (गुळाचे व साखरेचे)
- गुळाची चिक्की (शेंगदाणा, राजगिरा वडी, कोकोनट, राजगिरा-शेंगदाणा मिक्स पिनट बटर, शेंगदाणा क्रश चिक्की)
- गुलकंद राजगिरा वडी व रोल
- नायलॉन शाबुदाणा (गोड व तिखट)
- केळी चिप्स् (तिखट व मीठाचे)
- बटाटा वेफर्स (तिखट व मीठाचे)
- बटाटा चिलीमिली
- बटाटा चिवडा (गोड व तिखट)
- राजगिरा लाही
- गावरान खारे शेंगदाणे
- भरूच खारे व नारळपानी शेंगदाणे
- तिखट शेंगदाणे
- लक्ष्मीनारायण बटाटा चिवडा (शेंगदाणा तेलातील)
- उपवास शाबुदाणा खाकरा
- उपवासाचे गोड लिंबू लोणचे
- शेंगतेल
- शेंगदाणे (घुंगरू व गावरान)
- शाबुदाणा (कॅमल, सिध्दी, लुज)
- इन्स्टंट बारीक शाबुदाणा (कॅमल, सिध्दी)
- पॅकींग सायकल भगर
- राजगिरा इ.



**काटदरे उपवास पीठ**

- राजगिरा पीठ
- उपवास भाजणी पीठ
- शिंगाडा पीठ
- सोमवार भाजणी पीठ (भगर विरहित)

**तळण्यासाठी कच्चे पदार्थ**

- कच्चा नायलॉन शाबुदाणा
- बटाटा पापड
- बटाटा - भगर पापड
- बटाटा व शाबुदाणा
- रंगीत पापडी
- शाबुदाणा पापडी
- बटाटा बॉबी, बटाटा वेफर्स
- बटाटा खिस
- बटाटा शेव, बटाटा स्क्रु
- शाबुदाणा बॉबी

✻ **टीप :** डिस्काउंट ऑफर, नियम व अटी समजावून घेण्यासाठी एव्हरफ्रेश सुपरमार्टला भेट द्या !

॥ नावाप्रमाणेच सर्व काही फ्रेश ॥
**एव्हरफ्रेश सुपरमार्ट**
॥ प्रिमियम क्वॉलिटी ॥ ॥ भरघोस डिस्काउंट ॥

*नियम व अटी लागू

किराणा । मसाले । प्रिमियम ड्रायफ्रुटस् । बिस्कीटस् । नमकीन अॅन्ड स्वीटस् । बेकरी अॅन्ड मिल्क प्रॉ
नॅचरल प्रॉडक्टस् । पर्सनल, होम अॅन्ड बेबी केअर । आयुर्वेदिक वस्तु । पुजेचे साहित्य

**पंढरपूर अर्बन बँके समोर, दत्तपेठ, करमाळा. मो.7059293031**

# शेतमालाला भाव द्या, शेतकरीच सरकार चालवायला पैसे देतील

## जयवंतराव जगताप यांची महायुतीवर टिका



करमाळा(सं.प्र.): महायुती सरकार महिला, युवक, शेतकरी यांना वेगवेगळ्या योजनेतून तुटपूंजे पैसे देऊ करत आहे. आम्ही काय भिकेवर जगायचे का ? असल्या योजनांमधून पैसे देण्यापेक्षा शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव द्या. शेतकरीच सरकार चालवायला पैसे देतील; असे वक्तव्य करत माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी महायुतीवर निशाणा साधला.

महाविकास आघाडीचे उमेदवार व माजी आमदार नारायण पाटील यांच्या प्रचार सभेत श्री.जगताप बोलत होते.

पुढे बोलताना श्री.जगताप म्हणाले, की मुख्यमंत्र्याच्या सभेला पाचशे रूपये पैसे देऊन महिलांना आणण्यात आले होते. पुरूषांचा रेट वेगळाच होता. लोकसभेमध्ये लाडक्या दाजींनी हातात दांडके घेतल्यामुळे महायुती सरकारला विधानसभेच्या पार्श्वभुमीवर त्यांना लाडक्या बहिणींची आठवण झाली व त्यामुळे लाडकी बहिण योजना आणली. पंधराशे रूपये मध्ये काय होते, महिन्याला पंधराशे म्हणजे दिवसाला पन्नास रूपये देत आहेत. महागाई एवढी वाढलेली आहे, पन्नास रूपयांमध्ये काय येत आहे..? युपी बिहार वरून आलेले मोलमजुरी करणारे युवक दिवसाला दिडशे ते दोनशे रूपयांचा गुटखा मावा खाण्यावर पैसे खर्च करतो. मोलावर येणारा मजूर दिवसाला दोन-तीनशे रूपये खर्च करत असेलतर तुम्ही देत असलेल्या पन्नास रूपयात आम्ही काय करायचं, ही सगळी फसवेगिरी आहे असे म्हणून जगताप यांनी या योजनेवर व महायुतीवर टिका केली. महायुतीचे सरकार जरी परत आलं तरी त्यांना देखील ही योजना पुढे चालवणं शक्य होणार नाही. कारण वर्षाला ४६ हजार कोटींचा खर्च या योजनेवर होत आहे. ज्यामुळे विकासकामे रखडलेली आहेत.

विद्यमान आमदार शिंदे यांचेवर टिका करताना जगताप म्हणाले, की मतदारसंघात तीन हजार कोटींचा जो विकास झाला आहे तो मतदारसंघाचा नसून त्यांनी स्वत:चाच विकास करून घेतलेला आहे. ३६ गावातून एक लाख मते आहेत. विरोधकांना पुन्हा निवडणूक लढवण्याची तलफ होणार नाही अशा वाक्यांचा देखील वापर करत त्यांनी समाचार घेतला. शिंदे यांच्यामध्ये अहंकार निर्माण झाला आहे. गावातील सरपंच पदापासून विविध राजकीय पदे ही कार्यकर्त्यांना न देता त्यांच्या घरातील व्यक्तींनाच दिली जात आहेत. माढ्याहून आणलेले हे पार्सल आपल्याला परत पाठवायचं आहे; असेही श्री.जगताप यांनी सांगितले.

जयवंतराव जगताप यांचे भाषण सुरू असताना जनतेतून एका व्यक्तीने मध्येच त्यांना थांबवून मराठा आरक्षणाविषयी बोला.. अशी विनंती केली. त्यावेळी जगताप यांनी राजकारण्यांनी हे एक पिल्लू सोडलेले आहे. जातीयतेच रान करून तुमच्या आमच्यामध्ये फळी निर्माण करून राजकारण्यांना आपली पोळी भाजायची आहे. या गोष्टीपासून सर्वांनी सावध राहण्याची वेळ आहे. ओबीसी समाजाचे आरक्षण अबाधित ठेवून मराठा समाजाला आरक्षण मिळाले पाहिजे. मराठा आरक्षण मिळावं यासाठी तुम्हाला तुतारी फुंकायची आहे. नारायण आबांना निवडून दिलं तर ते मराठा आरक्षणाचा प्रश्न सरकारकडे मांडतील. यावेळी श्री.जगताप यांनी राम रहीम एक है, इमान का नाम मुसलमान है, मुसलमान कभी बिकता नही.. असे म्हणत मुस्लिम समाजाला आकर्षित करण्यासी वेगवेगळे उदाहरणे दिली. तसेच मुसलमान बांधवांनी महाविकास आघाडीचे उमेदवार नारायण पाटील यांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन जगताप यांनी केले.

समर्थ बालरूग्णालय स्त्रीरोग व प्रसुतीगृह
डॉ.वृषाली अभिजित हंकारे (M.B.B.S. D.G.O)
डॉ.उदयसिंह नामदेव गायकवाड (M.B.B.S. D.C.H)
उपलब्ध सुविधा.. • गरोदर माता तपासणी व उपचार • सुसज्ज प्रसुतीगृह व ऑपरेशन थिएटर • नॉर्मल आणि अति जोखमीची बाळंतपणे • मासिक पाळीचे आजार निदान व उपचार • वंध्यत्व निवारण • सिझेरियन प्रसुती • गर्भशयाचे आजार निदान व उपचार • मेनोपॉज क्लिनिक
महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजने अंतर्गत गरीब व गरजू रूग्णांसाठी ठराविक गंभीर आजारावर मोफत उपचार (MJPJAY)
• नवजात अर्भक अतिदक्षता विभाग (NICU) • व्हेंटिलेंटरची सोय
• बालरोग अतिदक्षता विभाग (PICU) • CPAP • Pulsoximeter
• दररोज लसीकरण सुविधा (Vaccination) • वाफेची सोय (Nebulizer)
• बाल दमा निदान व उपचार • सेंट्रल ऑक्सिजनची सोय • 02 Concentrator
गायकवाड चौक, करमाळा. (०२१८२-२२००५७, ९१४६४३०५५०)

# संजयमामांना पुन्हा आमदार करा, मी त्यांना नामदार करून दाखवतो

## आ.बबनराव शिंदे यांचे अभिवचन



करमाळा(सं.प्र.) : राज्यात काठावरचे सरकार येणार आहे. त्यामुळे तुम्ही संजयमामा यांना पुन्हा आमदार करा, मी त्यांना नामदार करून दाखवतो; असे अभिवचन माढा तालुक्याचे आमदार बबनराव शिंदे यांनी दिले.

वांगी नं.३ येथे आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. यावेळी माजी आमदार जयवंतराव जगताप गटाचे वांगी सोसायटीचे संचालक दिनकर रोकडे यांनी आ.शिंदे गटात प्रवेश केला. वांगी जिल्हापरिषद गटातील शेटफळ, दहिगाव, वांगी नं.२, शेलगाव, सांगवी नं.१, सांगवी नं.२, वांगी नं.१, वांगी नं.४, भिवरवाडी, बिटरगाव वांगी, वांगी नं.३ या गावामध्ये आमदार संजयमामा शिंदे यांनी प्रचार दौरा केला. त्यानंतर भव्य प्रचार सभा घेण्यात आली. त्यावेळी आमदार बबनराव शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

पुढे बोलताना आमदार बबनराव शिंदे म्हणाले, की आमच्या शिंदे कुटूंबातील कुठल्याही सदस्यांनी कोणत्याही ठेकेदाराकडून एक रूपायाही कधी घेतला नाही. मी असेन किंवा मामा असेन आम्ही कायम लोकसेवा करत आलो आहे. विठ्ठलराव शिंदे कारखाना हा दर दहा दिवसाला ऊसाचं पेमेंट देणारा महाराष्ट्रातील पहिला कारखाना आहे. शेळगाव येथे केळी संशोधन केंद्र व्हावे, करमाळा येथे शंभर बेडचे रूग्णालय आर्दीसाठी प्रयत्न केले. जातेगाव ते टेंभूर्णी रस्ता साठी आ.संजयमामा शिंदे यांनी विधानसभेत सातत्याने प्रश्न मांडला आहे. तालुक्यात पाणी आलं पण बाकीचा विकास नव्हता. परंतु संजयमामा आमदार झाल्यानंतर करमाळा तालुक्याची कामे होऊ लागली. उजनी धरणात पर्यटनाच्या माध्यमातून उत्पन्न वाढले पाहिजे , यासाठी संजयमामा यांनी काम केले आहे. त्यामुळे विकासकामाच्या जोरावर मामांना संधी द्यावी; असेही आवाहन आमदार बबनदादा शिंदे यांनी केले आहे.

श्री गजानन अगरबत्ती
• सुगंधी अगरबत्ती • कापूर
• अत्तर • धूप • भीमसेन कापूर,
• विविध कलरची रांगोळी
• सर्व प्रकारचे लोबन,
• सर्व प्रकारचे पुजेचे साहित्य योग्य दरात मिळेल !

पत्ता : वेताळपेठ, करमाळा., जि.सोलापूर
(प्रोप्रा : निखिल प्रदीप ढाळे, मो.8007255456)

पुनम एजन्सी
अंबुजा सिमेंटचे करमाळा तालुका वितरक
• बिल्डींग मटेरियल सप्लायर्स • प्लंबींग • हार्डवेअर
स्टील, सिमेंट, फरशी, ग्रेनाईट
होलसेल व रिटेल योग्य दरात मिळेल
प्रोप्रा : प्रमोद शिंदे (9552946544) पत्ता: बायपास रोड, जेऊर.

## विकासाची दृष्टी असलेले गणेश चिवटे यांची साथ

# डबल इंजिनमुळे तालुक्यातील विकासकामे गतीने होणार : आ.संजयमामा शिंदे




करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहर व तालुक्यातील सर्व प्रलंबित विकासकामे मार्गी लावली आहेत. पुन्हा आमदार झाल्यानंतर स्थिर सरकार मिळाले की दोन वर्षात राहिलेले प्रश्न मार्गी लावले जातील. गणेश चिवटे यांना विकासाची दृष्टी असून आपणही विकासाच्या माध्यमातून इथपर्यंत आलो आहोत. त्यामुळे आता आमच्या या डबल इंजिनमुळे तालुक्यातील विकासकामे गतीने होणार आहेत; असे प्रतिपादन आमदार संजयमामा शिंदे यांनी केले.

करमाळा विधानसभा मतदारसंघात भाजपाने शिस्तभंगाची कारवाई केल्यानंतर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य गणेश चिवटे यांचेसह शहराध्यक्ष जगदीश आगरवाल व त्यांच्या समर्थकांनी शक्तीप्रदर्शन करत अपक्ष उमेदवार आमदार संजयमामा शिंदे यांना पाठींबा दिला. त्यानंतर आयोजित सभेत आ.शिंदे बोलत होते. सुरूवातीला गायकवाड चौक येथून पदयात्रा काढत विकी मंगल कार्यालय येथे मेळावा घेऊन हा पाठींबा दिला. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत निघालेल्या या पदयात्रेने सर्वांचे लक्ष वेधले. करमाळा शहरासह संपूर्ण मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मला या निवडणुकीत विजयी करा; असे आवाहन आ.शिंदे यांनी यावेळी केले.

यावेळी बोलताना गणेश चिवटे म्हणाले, की १५-२० वर्षात सामाजिक क्षेत्रात काम करत असताना नागरीकांची सेवा केली.करमाळा शहर व तालुक्यातील विकासाचे चक्र पाहिजे तेवढ्या प्रमाणात फिरत नव्हती. तालुका शिक्षण, आरोग्य, रस्ते, वीज, रोजगार, उद्योग व्यवसाय याबाबतीत मागे आहे. येत्या काळात तालुक्यातील सर्व घटक स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीने आपण आमदार शिंदे यांना पाठींबा दिला आहे.

यावेळी चंद्रकांत सरडे, विलास पाटील, लतीफभाई तांबोळी, अमोल काळदाते, नितीन झिंजाडे, आजिनाथ सुरवसे, बंडू शिंदे, जगदीश आगरवाल, भगवान गिरी, मासाळ आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक अमोल पवार यांनी केले तर आभार उमेश मगर यांनी मानले. यावेळी मंचावर जि.प.चे माजी सदस्य उध्दव माळी, कन्हैयालाल देवी, पै.अफसर जाधव, रामा ढाणे, मोहन शिंदे, तात्या मस्कर, विवेक येवले, गौरव झांजुर्णे, संजय घोलप, काकासाहेब सरडे, ॲड.नितीनराजे राजेभोसले, सरपंच किरण फुंदे, भोजराज सुरवसे, आशिष गायकवाड, डॉ.अभिजीत मुरूमकर, नितीन निकम, सोमनाथ घाडगे, किरण शिंदे, जयंत काळे-पाटील, धनु किरवे, धर्मा नाळे, दादा देवकर, उदय ढेरे, लक्ष्मण शेंडगे, सतीश फंड, अभिषेक आव्हाड, गणेश वाळुंजकर, संगीता नष्टे, राजश्री खाडे, चंपावती कांबळे उपस्थित होते.

घरगुती डबा मिळेल
• अत्यंत रूचकर व चवीष्ठ जेवणाचा घरगुती डबा मिळेल •
• १ डबा - ६० रू. • दररोज १ डबा - १५०० रू. (महिना)
• दररोज २ वेळचा डबा - २५०० रू. (महिना)
संपर्क मो.9699859227



साई स्टील रेलिंग & किचन ट्रॉलीज्
सर्व प्रकारचे स्टील रेलींग, मेनगेट किचन ट्रॉलीची सर्व कामे खात्रीशीर व वेळेवर करून मिळतील.
प्रोप्रा : प्रशांत जोशी मो.9881028191 / 7798304502
पत्ता : सय्यद कॉम्प्लेक्स, करमाळा-नगर रोड, बायपास, करमाळा.

खुशखबर खुशखबर
मुळव्याधवर ट्रीटमेंटसाठी नको औरंगाबाद(२०८ किमी), नको मिरज (२३० किमी), आता आपल्या करमाळा (१/२ किमी) शहरात
डॉ.लोकरे हॉस्पिटल मध्ये सोमवार व गुरूवारी उपलब्ध
बार्शी येथील सुप्रसिध्द मुळव्याध तज्ञ
डॉ.विकास देविदास नागरगोजे (एम.एस.मुंबई)
उपलब्ध सुविधा...
• मुळव्याधवर इंजेक्शन • डिलीव्हरीनंतर उद्भवारे कोंब • एकदा ऑपरेशन करून पुन्हा उद्भवणारे कोंब • संडासवाटे रक्त येणे, पु येणे • संडासची जागा बाहेर पडणे • संडास जागी खाज व आग होणे • संडासाचा नागवेडा • संडास नंतर बसण्यास त्रास होणे • भगंदर, फिशर • चार प्रकारचे मुळव्याध (४ प्रकारचे इंजेक्शन)
ओपीडी /ऑपरेशन ठिकाण
दर गुरूवार व सोमवार
वेळ : सकाळी ९.०० ते १२.००
लोकरे हॉस्पिटल
कृष्णाजीनगर, बायपास रोड करमाळा., जि.सोलापूर
(९८५०८५१००५)
परिचय
डॉ.विकास देविदास नागरगोजे
मुळव्याध तज्ञ
पदवी : नाशिक
पदवोत्तर : मुंबई



ओपीडीचे वैशिष्ट्ये...
• इंजेक्शन सुविधा • लेझर सुविधा
• प्रभावी औषधी सुविधा • मुळव्याधी आवश्यक ड्रेसिंग
• मेडिक्लेम सुविधा उपलब्ध • पार्किंगची व्यवस्था
• आठवड्यातून दोनदा ओपीडी
विशेष सुचना... १. प्रत्येक ओपीडी दिवशी १० रूग्णांची तपासणी करण्यात येईल. २. येताना जुन्या आजाराची फाईल घेऊन येणे. ३. इंजेक्शनचा निर्णय डॉक्टरांचा राहील. ४. तपासणी अगोदर नावनोंदणी अनिवार्य. ५. परगावच्या रूग्णांनी आदल्या दिवशी फोन करावा.
नाव नोंदणीसाठी संपर्क
मो.9763035862
बार्शी धन्वंतरी मुळव्याध सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल कोर्ट समोर, बार्शी.

## महायुतीचे उमेदवार दिग्विजय बागल यांच्या प्रचारार्थ

# रश्मी बागल यांच्या नेतृत्वाखाली वांगी नं.३ येथे महिला मेळावा



करमाळा(सं.प्र.): करमाळा - माढा विधानसभा मतदारसंघातील शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार दिग्विजय दिगंबरराव बागल यांच्या प्रचारार्थ भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांच्या नेतृत्वाखाली वांगी नं.३ येथे महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमातून महिलांचे बागल कुटूंबावर असलेलं प्रेम पुन्हा एकदा अधोरेखित झाले. आजचा हा लाडकी बहिण मेळावा विशेष होते. स्व.दिगंबरराव बागल मामा यांच्या स्मृतीस वंदन करताना महिलांनी लिहिलेले सुंदर स्मृतीगीत यावेळी सादर केले. स्व.बागल मामा हे केवळ एक व्यक्तीमत्व नसून एक विचार आहे आण आपले दिग्विजय बागल हे त्याच विचारांचे पाईक आहेत.

मतदारसंघातील आणि गावातील विकासासाठी या निवडणुकीत जनतेने सक्षम नेतृत्वाला पाठींबा दिला पाहिजे. दिग्विजय बागल यांचे रूपाने आपल्याला एक नवं सशक्त आणि सर्वांगीण विकासाची आकांक्षा असणारं नेतृत्व मिळणार आहे. त्यामुळे प्रत्येकाने या संधीचं स्वागत करावं असा संदेश ग्रामस्थांना दिला. हा मेळावा केवळ राजकीय कार्यक्रम नसून एक कौटूंबिक सोहळा होता. म्हणूनच सर्व बहिणींनी एकजुटीने महायुतीचे उमेदवार दिग्विजय बागल यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहण्याचं ठरवलं असून दिग्विजय बागल यांना विजयी करण्याची जबाबदारी सर्व लाडक्या बहिणींनी घेतली आहे.

प्रियंका आय केअर हॉस्पीटल
पुणे रोड, त्रिमुर्ती कुशनचा वरचा मजला, करमाळा. मो.9423222266, 9604762600
उपलब्ध सुविधा... डोळ्यांच्या आजारावरील निदान व उपचार केंद्र
• मोतीबिंदू, काचबिंदू, नासूर, तिरळेपणा, दृष्टिदोष वरील निदान व उपचार
• जपानच्या अत्याधुनिक मशीनव्दारे शास्त्रोक्त पध्दतीने तपासणी व उपचार
• फॅकोइमलसीफिकेशनी बिनटाक्याची मोतीबिंदू वरील शस्त्रक्रिया.
• सुसज्ञ ऑपरेशन थिएटर • नेत्रपटल आजाराचे निदान व उपचार
• लेसर मशीनव्दारे लेन्स वरील जाळी काढण्याची सोय
• एस्कॅन बायोनेट्री आणि केरॉटोमॅट्री
डॉ.डी.बी.केमकर
(M.S.DOMS) नेत्ररोग तज्ञ
कन्सल्टिंग ऑफ्थॅलमोलॉजीस्ट व ऑफ्थॅलमिक सर्जन
अत्याधुनिक प्रकारची लेझर सुविधा उपलब्ध ! (Nd YAG LASER) रविवारी बंद
वेळ : सकाळी १० ते ६ (सोमवार ते शनिवार)
आदिका मेडिकल, पुणे रोड, करमाळा., जि.सोलापूर


२४४ करमाळा विधानसभा निवडणुक २०२४
महायुतीचे शिवसेना व मित्र पक्षांचे अधिकृत उमेदवार
श्री.दिग्विजय दिगंबरराव बागल
धनुष्यबाण
मतदार बंधू भगिणींनो.., आपल्या मतदार संघाला सुजलाम, सुफलाम बनवण्यासाठी 'धनुष्यबाण' या चिन्हा समोरील बटन दाबून महायुतीच्या उमेदवारास प्रचंड बहुमताने विजयी करावे !
१
दिग्विजय दिगंबरराव बागल
लाडक्या बहिणींचा लाडका भाऊ दिग्विजय बागल
मतदान : बुधवार, २० नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ७ ते सायं ६ पर्यंत
प्रकाशक : नरेंद्रसिंह ठाकूर, करमाळा.
श्री.गणेश मोहन कराड
प्रदेश सचिव- भाजपा ओबीसी आघाडी
मिडीया प्रमुख-श्री देवेंद्र फडणवीस सोशल मिडीया

# ॥ प्रथम वर्षश्राध्द ॥



अण्णा.. आम्हा सर्वांना सगळं शिकवलं, पण
तुम्ही नसताना जगायचं कसं हे नाही शिकवलं !

तुमच्या प्रेमाचा ओलावा
कशातच नाही असा गोडवा
तुमच्या आठवणींपेक्षा
आम्हांस तुमचा सहवासच भेटावा
अजुनही वाट पाहती हे नयन
यावे परतुनी आपण...
पुन्हा लाभावा तुमचा सहवास,
एवढाच आमचा अट्टाहास..!

आमचे पिताश्री

## कै.अशोक महादेव दहिदुले

यांचे 'प्रथम वर्षश्राध्द'
शनिवार, दि.२३/११/२०२४ रोजी होणार आहे.
याप्रसंगी पुष्पांजली वाहण्यास आपण उपस्थित रहावे; ही विनंती !



ह.भ.प.दिनेश किरवे महाराज यांचे सकाळी १० ते १२ किर्तन होणार असून त्यानंतर पुष्पांजली वाहण्याचा व महाप्रसाद वाटपाचा कार्यक्रम होईल.

स्थळ : मुथानगर, पुणे रोड, करमाळा.

अभिवादक
**समस्त दहिदुले परिवार**
करमाळा, जि.सोलापूर

---

# पाचवे पुण्यस्मरण



आमचे पिताश्री

## कै.जगन्नाथ राजाराम लोणकर

यांचे ५ वे पुण्यस्मरण दिनानिमित्त
त्यांचे पवित्र स्मृतीस
**भावपूर्ण आदरांजली..!**

आपले नम्र
श्री.प्रकाश जगन्नाथ लोणकर , श्री.सुरेश जगन्नाथ लोणकर, सौ.उज्वला राजन एकतपुरे
समस्त लोणकर परिवार, महेंद्रनगर, करमाळा. (९४२३०४४७१६/९२७२१९२०४७)

---

# भावपूर्ण श्रध्दांजली



कै.विनायक(आबा) शंकर सोरटे

श्रीदेवीचामाळ येथील रहिवाशी

## कै.विनायक(आबा) शंकर सोरटे

यांचे अल्पशा आजाराने नुकतेच
निधन झाले. ईश्वर त्यांचे आत्म्यास
चिरशांती देवो, हीच आमची
कमलाभवानी चरणी प्रार्थना..!

• दशक्रिया विधी •
मंगळवार दि.१९/११/२०२३ रोजी
सकाळी संगोबा येथे होणार आहे

शोकाकुल
**राजेरावरंभा तरूण मंडळ, श्रीदेवीचामाळ**

---

# तृतीय पुण्यस्मरण



कै.बाळासाहेब विष्णुपंत लावंड

सहवास जरी संपला तरी, आपला सुगंध दरवळत राहील
आयुष्याच्या प्रत्येक वळणावर, आठवण तुमची नेहमीच येत राहील
पुर्नजन्म घ्यावा तुम्ही, हीच आमची कमलाभवानी चरणी प्रार्थना !

आमचे पिताश्री

## कै.बाळासाहेब विष्णूपंत लावंड

यांच्या दि.१८/११/२०२४ रोजी असलेल्या तृतीय पुण्यस्मरण
दिनानिमित्त त्यांचे पवित्र स्मृतीस भावपूर्ण आदरांजली !

अभिवादक
चंद्रशेखर बाळासाहेब लावंड, धैर्यशील बाळासाहेब लावंड
लावंड परिवार, करमाळा.

## मोटारसायकलची समोरासमोर धडक - अतुल जानभरे यांचे निधन

करमाळा (सं.प्र.) : चिखलठाण येथे दोन मोटारसायकलची समोरासमोर धडक होऊन झालेल्या अपघातात अतुल चंद्रकांत जानभरे (वय-४०, रा.चिखलठाण) यांचे उपचार सुरू असताना निधन झाले आहे. हा अपघात २९ ऑक्टोबरला सायंकाळी सातच्या सुमारास चिखलठाण येथील प्रमोद गव्हाणे यांचे शेतीजवळ घडलेला आहे.

या प्रकरणी विवेक चंद्रकांत जानभरे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की माझा भाऊ अतुल चंद्रकांत जानभरे हा मोटारसायकल क्र.एमएच ४५ एक्स ५१३५ वरून चिखलठाणकडून शेटफळकडे जात असताना जेऊरवरून चिखलठाणकडे येणाऱ्या मोटारसायकल क्र.एमएच ४५ एआर ८९४२ वरील मोटारसायकल चालक शहाजी सुभाष डोके (रा.चिखलठाण) याने वेगात मोटारसायकल चालवून समोरून धडक दिली. त्यात माझा भाऊ गंभीर जखमी झाला. त्याला उपचारासाठी बार्शी येथे घेऊन गेलो होतो. परंतु उपचार चालू असताना १ नोव्हेंबरला पहाटे दीड वाजता त्याचे निधन झाले आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस निरीक्षक पोपट टिळेकर हे करत आहेत.

### जेवणासाठी १५-२० कांदे काढल्याच्या कारणावरून

## मालकाकडून कामगारास काठीने व खोऱ्याच्या दांडक्याने मारहाण

करमाळा(सं.प्र.) : ट्रॅक्टरवर काम करणाऱ्या कामगाराने जेवणाच्या वेळी उपयोगी पडतील म्हणून रस्त्यावरील शेतातील १५-२० कांदे काढले. हे पाहून शेतकऱ्याने या कामगाराला काठीने व खोऱ्याच्या दांडक्याने बेदम मारहाण केली आहे. हा प्रकार १० नोव्हेंबरला सायंकाळी चार वाजता अर्जुननगर (ता.करमाळा) येथे घडला आहे. या प्रकरणी बाळासाहेब संभाजी कडू (ट्रॅक्टर ड्रायव्हर, पोथरे) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की अर्जुननगर येथे आम्ही ट्रॅक्टर मधील वीटा खाली करून परत येत असताना जवळच्या शेतात कांदे दिसले, ते भाकरीबरोबर खाण्यासाठी उपयोगी पडतील म्हणून १५-२० कांदे उपटले. त्यावेळी त्या शेतीचा मालक विजय नवनाथ धुमाळ (रा.अर्जुननगर) हे तेथे पळत आले व त्यांनी हातातील लाकडी काठीने व खोऱ्याच्या दांडक्याने हातावर व मांडीवर, गुडघ्यावर मला तसेच रविंद्र मोरे यास मारहाण केली. हा ट्रॅक्टर इथून हलवला तर तो जाळून टाकीन अशी धमकी दिली. या प्रकरणी पोलीसांनी शेतकऱ्या विरूध्द गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस शिपाई प्रदीप चौधरी हे करत आहेत.

### समाईकातील विहिरीवरील पाणी घेण्याच्या कारणावरून

## एकमेकांविरूध्द मारहाणीच्या फिर्यादी दाखल

करमाळा (सं.प्र.) : समाईकातील विहिरीवरील पाणी घेण्याच्या कारणावरून सहा जणाकडून एकास व भांडण सोडविण्यास आलेल्या लोकांना चटणी टाकून काठीने, गॅसच्या पाईपने मारहाण केली आहे. हा प्रकार १० नोव्हेंबरला सकाळी १० च्या सुमारास झरे, ता.करमाळा येथे घडला आहे. या प्रकरणी दत्तात्रय ज्ञानदेव जाधव रा.झरे यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की मी व माझे चुलतभाऊ हनुमंत जाधव यांच्यात समाईकात विहिर आहे. १० नोव्हेंबरला सकाळी दहा वाजता मकाच्या पिकाला पाणी देण्यासाठी मी मोटार चालू केली असता, तेथे हनुमंत शिवाजी जाधव आला व तु पाण्याच्या पाळ्या लाव, त्यानंतर मोटार चालू कर.. असे म्हणून त्याने भांडण सुरू केले व माझ्या पाठीत दगड मारला. त्यानंतर मी घरी गेलो असता, तेथे हनुमंत जाधव याच्याशिवाय सुभाष जाधव, नितीन जाधव, अक्षय जाधव, विनोद जाधव, शंकर जाधव हे आले व त्यांनी शिव्या देवून मला काठीने, गॅसच्या पाईपने मारहाण सुरू केली. त्यावेळी माझी पत्नी व भावजयी तसेच पुतणी हे सोडविण्यास आले असता या लोकांनी त्यांनाही बेदम मारहाण केली आहे. या प्रकरणी पोलीसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

यातच दुसरी फिर्याद शंकर यशवंत जाधव यांनी दिली असून त्यात त्यांनी म्हटले आहे, की दत्तात्रय जाधव, शिल्पा जाधव, लता जाधव, अक्षय जाधव या सर्वांनी माझा पुतण्या हनुमंत जाधव यास ऊस तोडण्याच्या कोयत्याने त्याच्या व माझ्या डोकीत मारहाण केली आहे. यातही पोलीसांनी या सर्वांच्या विरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

## मोटारसायकल घसरून झालेल्या अपघातात तरूणाचे निधन

करमाळा (सं.प्र.) : रात्रीच्या वेळी समोरून आलेल्या चारचाकी गाडीच्या प्रकाशाने मोटारसायकल चालकास काहीच न दिसल्याने अचानक ब्रेक दाबल्याने मोटारसायकल घसरून झालेल्या अपघातातील तरूण तानाजी बाबासाहेब लांडगे (रा.पारेवाडी, ता.परांडा) यांचे निधन झाले आहे. या प्रकरणी चंद्रकांत जोतिराम वाळुंजकर (रा.पारेवाडी, ता.परांडा) यांनी फिर्याद दिली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे, की १३ ऑक्टोबरला सायंकाळी साडेसात वाजता मी व माझा मेहुणा तानाजी बाबासाहेब लांडगे असे दोघेजण मोटारसायकलवर उरळीकांचन (पुणे) येथे निघालो होतो. रस्त्यात कोटी गावाजवळ समोरून आलेल्या चारचाकीच्या प्रकाशात माझे मेहुणे यांना पुढचे काही दिसले नाही. त्यामुळे त्यांनी मोटारसायकलचे अचानक ब्रेक दाबले. त्यामुळे आमची मोटारसायकल घसरून खाली पडली. त्यात मलाही लागले व माझे मेहुणे तानाजी लांडगे यांनाही लागले. त्यातच त्यांचे निधन झाले आहे.

### करमाळा विधानसभा मतदार संघ

## विनोद सितापुरे यांचा प्रचार सुरू

**तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी विजयी करण्याचे आवाहन**



करमाळा : करमाळा विधानसभा मतदार संघातील अपक्ष उमेदवार विनोद दिलीप सितापुरे (दाळवाले) यांच्या प्रचारास प्रारंभ झाला आहे. निवडणुक आयोगाने त्यांना 'बासरी' हे चिन्ह दिले असून **श्रीकृष्णाची बासरी** घेऊनच आपण मंत्रालयात जावू; अशी त्यांची घोषणा आहे. सितापुरे यांनी होम टू होम प्रचार करून मतदारांना मतदानासाठी आवाहन केले असून त्यांना नागरीक व महिलांचा पाठींबा मिळत आहे. तसेच ग्रामीण भागातही त्यांनी जोरदार प्रचार सुरू केला असून नागरीकांचीही त्यांना साथ मिळत आहे.

निवडणुकीच्या जाहीरनाम्यात त्यांनी करमाळा तालुक्यात बारामती पॅटर्न राबविणार, विकासाची गंगा आणणार, जेऊर रेल्वेस्थानकावर सर्व गाड्यांना थांबा देण्याचा प्रयत्न करणार, शहर व तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणार, रिटेवाडी उपसासिंचन योजना मार्गी लावणार, अशाप्रकारे तालुक्यात विविध विकासकामे करणार असल्याचे विनोद सितापुरे यांनी सांगितले.

करमाळा तालुक्याचा विकास हाच आपला ध्यास असून, मतदारांनी येत्या २० तारखेला **बासरी** चिन्हा समोरील बटन दाबून आपणांस प्रचंड मताधिक्याने निवडून द्यावे; अशी विनंती विनोद सितापुरे यांनी प्रचार दरम्यान मतदारांना केले आहे.




२४४, करमाळा-माढा विधानसभा निवडणूक २०२४

अपक्ष उमेदवार

विनोद दिलीप सितापुरे

**वचननामा**




- बारामती पॅटर्न राबवणार.
- विकासाची गंगा आणणार.
- जेऊर रेल्वे स्टेशनला सर्व गाड्यांना थांबा देण्याचा प्रयत्न करणार.
- करमाळा तालुक्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावणार.
- ऊसाला योग्य हमी भाव मिळवून देवून ऊसाची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात त्वरीत जमा करण्यासाठी प्रयत्न करणार.
- शेतकऱ्यांच्या मालाला भाव देणार.
- रिटेवाडी उपसासिंचन योजना मार्गी लावणार.

"एकच ध्यास करमाळा तालुक्याचा विकास"

२० तारखेला मतदार बंधू भगिणींनो, **'बासरी' चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने मला विजयी करावे** आणि आपल्या मतदार संघाला सुजलाम, सुफलाम बनवण्याची संधी द्यावी.

| १३ | विनोद दिलीप सितापुरे (दाळवाले) | बासरी |
| --- | --- | --- |

प्रकाशक : विजय दिलीप सितापुरे, करमाळा.



# मस्कर ॲग्रो सर्व्हिसेस
व
सर्व सेवा केंद्र
# मस्कर ट्रेडिंग कंपनी



आयडोल ठिबक व तुषार सिंचन, पारस गोल्ड
धानुका, तेजस्, स्वस्तिक पाईप, मर्सिबल, सबमर्सिबल पंप, मल्चींग पेपर,
प्लंबींग हार्डवेअर मटेरियल व शेतीपयोगी साहित्य योग्य दरात मिळेल.

बायपास चौक, उड्डाण पुला जवळ, कमलादेवी रोड, करमाळा.
प्रोप्रा : कैलास काशिनाथ मस्कर, मो.9921325558, 9767655558

# करमाळा शहरात गुरूनानक जयंती उत्साहात साजरी





करमाळा(सं.प्र.) : करमाळा शहरात गुरूप्रसाद मंगल कार्यालय दत्तपेठ येथे गुरूनानक जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जवळपास दीड हजार महिला व पुरूषांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. तसेच यावेळी करमाळा शहर व परिसरातील सर्व गुरूनानक प्रेमी बांधव व महिला वर्ग उपस्थित होता. तसेच कमलभवानी ब्लड बँकेच्या सहाय्याने रक्तदान शिबीरही घेण्यात आले. यावेळी ७० रक्तदात्यांनी रक्तादानात सहभाग नोंदवला.



श्रीदेवीचामाळ येथील श्री कमलादेवीच्या
यात्रेनिमित्त येणाऱ्या सर्व भाविक भक्तांचे
**सहर्ष स्वागत..!**

सरपंच



सौ.रेणुका सिध्देश्वर सोरटे

उपसरपंच



श्री.सचिन शिंदे

स्वागतोत्सुक
**ग्रामपंचायत श्रीदेवीचामाळ, ता.करमाळा**
सर्व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ

करमाळा व परिसरातील त्वचा रूग्णांच्या सेवेसाठी
सोलापूर येथील **त्वचारोग तज्ञ**

# डॉ.संकेत मंडलेचा MBBS, DDV (Pune)

**प्रत्येक महिन्याचा दुसरा व चौथा शुक्रवारी सकाळी १० ते दु. २ पर्यंत**




**त्वचा विकार :** नायटा/गजकर्ण, इसब, खरूज, काळे डाग, सोरायसिस, पिंपल्स, चाई, कोंडा, स्ट्रेचमार्क, केस गळती, जुनाट खाज, ॲलर्जी, अतिरिक्त घाम येणे, वांग, नागिण, कांजण्या,नखांचे आजार, सुरमा इ.आजारांवर खात्रीशीर उपचार व सल्ला

संपर्क : डॉ.सारंगकर डेंटल क्लिनिक
करमाळा-जेऊर रोड, कॉटेज हॉस्पिटल समोर, करमाळा., जि.सोलापूर

**अपॉईंटमेंट : मो.9423333904**

# विनायक सोरटे यांचे अल्पशा आजाराने निधन



करमाळा(सं.प्र.) : श्रीदेवीचामाळ येथील रहिवाशी असलेले विनायक (आबा) शंकर सोरटे यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे मागे तीन मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. भाऊसाहेब सोरटे, श्रीराम सोरटे व अंकल सोरटे यांचे ते वडील होते. आमदार संजयमामा शिंदे यांनी सोरटे यांच्या घरी भेट देऊन त्यांचे कुटूंबाचे सांत्वन केले. त्यांच्या अंत्यविधी प्रसंगी सर्व स्तरातील नागरीक उपस्थित होते.

**विघ्नहर्ता इंटिरीयर**
प्रोप्रा : अभिषेक कमलेश देवी
मो.9028075051

करमाळा शहरातील एकमेव
'लॅमिनेट आणि हार्डवेअर' चे भव्य शोरूम
**देवी प्लायवुड ॲन्ड हार्डवेअर**


• प्लायवुड • किचनट्रॉली • वॉलपेपर
• हार्डवेअर • फेव्हिकॉल • वुडन प्लोरिंग • सनमायका



प्रोप्रा : अभिनव कमलेश देवी 9011524252

पत्ता : मेनरोड, जैन मंदिर जवळ, करमाळा., जि.सोलापूर

शुध्द.. स्वच्छ..स्वादिष्ट नी रूचकर..!
# चिवटे उपहारगृह



| साऊथ इंडियन | नाष्टा | स्नॅक्स | चाट | स्विट | नमकिन |
|---|---|---|---|---|---|
| इडली सांबर<br>उडीदवडा सांबर<br>उत्तप्पा<br>डोसा | पुरी भाजी<br>मिसळ पाव<br>पोहे/उपमा<br>दहीवडा/शिरा | पावभाजी<br>तवापुलाव<br>सँडविच<br>फिंगर चिप्स | पाणीपुरी<br>स्पे.भेळ<br>रगडा पॅटिस<br>राज कचोरी | पेढा, बर्फी<br>लाडू, जामून<br>म्हैसुरपाक<br>काजू कतली | फरसान<br>शेव<br>स्पे.चिवडा<br>पापडी |

| डेअरी | | कोल्ड्रींक |
|---|---|---|
| दही, दुध<br>खवा, पनीर<br>बासुंदी<br>लस्सी | साऊथ इंडियन, नमकिन, नाष्टा, स्वीट, चाट, डेअरी, उपवास पदार्थ मिळतील.<br>एकवेळ अवश्य भेट द्या..!<br>राशिनपेठ, करमाळा. मो.९००६९४३००६ | कोल्डकॉफी<br>ज्युस<br>मिल्कशेक<br>आईस्क्रीम |

## जिद्द व धाडसाच्या जोरावर यश

# 'कमलाई पेपर प्लेट' ची यशस्वी वाटचाल !

करमाळा : जिद्द व धाडस दाखवल्यानंतर कोणत्याही व्यवसायात यश मिळते, असे म्हटले जाते. त्याची प्रचिती करमाळा शहरातील यशस्वी उद्योजिका सोनाली योगेश सुरवडे यांच्या माध्यमातून आली आहे. प्रतिकुल परिस्थितीवर मात करत त्यांनी नाश्ता प्लेट व पंतरवाळी हा व्यवसाय सुरू केला आणि एका वर्षात तो व्यवसाय यशस्वी केला आहे.

सौ.सुरवडे यांना घरामध्ये व्यवसाय करावा, अशी मनापासून इच्छा होती. त्यादृष्टीने त्यांनी पती योगेश सुरवडे व मुले सार्थक व अथर्व यांच्याशी चर्चा केली. विशेष म्हणजे घरातील सर्वांनीच त्यांना पाठबळ दिले. त्यानंतर त्यांनी कोणता व्यवसाय करावा, यासाठी युटूबवर अनेक व्हीडीओ सर्च केले. त्यानंतर त्यांना नाष्टा प्लेट व पंतरवाळी बनविण्याचा व्यवसाय आवडला. त्यादृष्टीने त्यांनी त्या व्यवसायाचे अनेक व्हीडीओ पाहिल्या. त्यातूनच त्यांनी नगर येथील उद्योजक कृष्णा पेपर्स यांचा मोबाईल क्रमांकही मिळवला. त्यानंतर कृष्णा पेपर्सचे मालक श्री.मुळे यांनी त्यांना पूर्ण सहकार्य दिले व उद्योग करण्यासाठी आवश्यक मशिनरीची माहिती दिली. त्यासाठी आवश्यक लागणारे भांडवल म्हणजे मशिनरी १ लाख ८० हजार रूपये व कच्चा मालासाठी ७० हजार रूपये आवश्यक होते. यासाठी त्यांनी बचत गटातून काही रक्कम व स्वत:चे दागिणे बँकेत ठेवून ही रक्कम गोळा करून सन २०२३ मध्ये विजयादशमीला स्वत:च्या घरी कुंकू गल्लीमध्ये हा व्यवसाय कमलाई पेपर प्लेट या नावाने सुरू केला. गेल्या वर्षभरात त्यांनी स्वत:चा व्यवसाय यशस्वीरित्या चालविला असून करमाळा शहर व तालुक्यात प्लेट आणि पंतरवाळी विक्रीचे काम त्या करत आहेत. या कामात मार्केटींगसाठी मुले सार्थक व अथर्व यांचे सहकार्य मिळत आहे. गेल्या वर्षभरात केलेल्या कामातून जवळपास ५० टक्के भांडवल त्यांचे उत्पन्नातून जमा झाले आहे. लवकरच पाणी ग्लास व चहा ग्लास उत्पादीत करण्याचा मानस आहे.



माझे पती योगेश सुरवडे व मुले सार्थक व अथर्व यांनी मला पाठबळ दिले. भांडवल जेव्हा कमी पडू लागले तेव्हा मी दागिण्याचा विचार न करता बँकेत दागिणे ठेवून हा व्यवसाय सुरू केला. विशेष म्हणजे करमाळा शहरातील जनता बाजार, संतोषकुमार गुगळे, मुथाशेठ रावगावकर, सोहम ट्रेडर्स (संचेती) या व्यापाऱ्यांनी चांगली साथ दिली. त्यामुळे मी व्यवसायात यशस्वी होवू शकले. याशिवाय शहर व तालुक्यातील अनेक नागरीक व्यक्तीगत कार्यक्रमासाठी व छोटे व्यावसायिक संपर्क साधून प्लेट व पंतरवाळ्या घेऊन जात आहेत. सर्वांच्या सहकार्यामुळे मी एक महिला असूनही यशस्वी झाले आहे. भविष्यातही मला असेच सहकार्य मिळावे.

**...सौ.सोनाली योगेश सुरवडे (९८२२६९७५७५)**



***

## राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेत

# शिवम चिखले याने पटकाविला नॅशनल चॅम्पियनचा बहुमान

करमाळा(सं.प्र.): विद्या विकास मंडळ संचलित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयातील विद्यार्थी शिवम चिखले याने गुजरात येथे आयोजित राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त करून नॅशनल चॅम्पियनचा बहुमान पटकविला आहे.

१७ वर्ष वयोगट मुले रिकव्ह या प्रकारामध्ये महाराष्ट्र संघाकडून खेळताना सुवर्णपदक प्राप्त केले. तसेच संपूण स्पर्धेमध्ये ७२० पैकी ६७० गुणांक प्राप्त करून देशामध्ये सहावा क्रमांक प्राप्त केला. त्यामुळे त्याची खेलो इंडिया या स्पर्धेमध्ये निवड झाली आहे. शुभम याने सुवर्णपदक प्राप्त केल्याने तो नॅशनल चॅम्पियन झाला. त्याला महाविद्यालयाचे शारिरीक शिक्षण शिक्षक प्रा.राम काळे यांचे मार्गदर्शन लाभले. शिवम याने करमाळा तालुक्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर झळकावल्या बद्दल विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव



घुमरे, संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य मिलींद फंड, सहसचिव विक्रमसिंह सुर्यवंशी, प्राचार्य डॉ.एल.बी.पाटील, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य संभाजी किर्दाक तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचारी वृंद यांनी शिवम चिखले याचे विशेष अभिनंदन केले.

# करमाळा तालुक्याच्या पूर्व भागाचे भविष्य बदलवणार : आ.शिंदे



करमाळा : करमाळा तालुक्याच्या पुर्व भागाची वरदायिनी असलेली दहिगाव उपसासिंचन योजना आपण पूर्ण क्षमतेने चालविणार असून आवर्तन कालावधीमध्ये एखादा पंप जळाल्यास त्याचा परिणाम आवर्तनावरती होतो. त्यामुळे दहिगाव टप्पा १ येथे अधिकचा १ पंप व कुंभेज टप्पा २ येथे अधिकचा १ पंप असे २ पंप आपण जास्तीचे बसविणार आहे. त्यामुळे एखादा इलेक्ट्रीक पंप जळाल्यास त्याचा परिणाम आवर्तनावरती होणार नाही. योजा पूण क्षमतेने कार्यान्वीत राहील. परिणामी शेतकऱ्यांची बारमाही पिके चांगले येतील. दहिगाव उपसाच्या पट्ट्यातील गावांमध्ये शेतकरी ऊसाबरोबरच केळी या पिकाकडे वळलेले आहेत व त्यातून कोट्यावधी रूपयांचे उत्पन्न ते काढत आहेत, ही समाधानाची बाब आहे. इथून पुढी सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या शेतीसाठी लागणारे पाणी आपण त्यांना पूर्ण क्षमतेने बंद नलिका वितरण प्रमाणे उपलब्ध करून देऊ. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये निश्चित समृध्दी येईल आणि ही समृध्दी करमाळा तालुक्याच्या पूर्व भागाचे भविष्य निश्चितच बदलवेल; असे प्रतिपादन आमदार संजयमामा शिंदे यांनी केले.

फिसरे येथे आयोजित प्रचारसभेत आ.शिंदे बोलत होते. यावेळी व्यासपीठावर विलास पाटील, तानाजी झोळ, मनसेचे संजय घोलप, गणेश चिवटे, हनुमंत मांढरे-पाटील, भरत अवताडे, अमोल काळदाते, गौतम ढाणे, राजेंद्र बाबर, सुर्यकांत पाटील, अजित विघ्ने, दत्ता अडसुळ, विवेक येवले, मानसिंग खंडागळे, राहुल कुकडे, सचिन वीर, प्रदीप दौंडे, संदीप नेटके व ग्रामस्थ उपस्थित होते. उपस्थितांचे आभार भरत अवताडे यांनी मानले.






# रमेशभाऊ किती घाई केलीस रे..!

रमेश उर्फ शहाजी विश्वनाथ वीर हा माझा चुलत भाऊ असला, तरी तो मला सख्ख्या भावासारखा व मित्रासारखा होता. त्याचे कोणाशीच वैर नव्हते किंवा कोणीच विरोधक नव्हते. सतत हसतमुख आणि इतरांना हसविणारा असे त्याचे व्यक्तिमत्व होते. त्याच्या अचानक जाण्यामुळे आमच्या वीर परिवाराची कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण झालेली आहे.

तहसील कार्यालयाचे आवारातील प्रत्येक गाळेधारकांशी त्याचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे होते. तो एखादे दिवशी दिसला नाही तरी प्रत्येकजण त्याची आपुलकीने चौकी करीत असत. त्याने त्याची स्वत:ची कसल्याही प्रकारची व्यथा कधीही कुणालाही सांगितली नाही. त्याचे स्वभावात दोन पैलू अतिशय गुणी आणि महत्वाचे होते. एक म्हणजे तो दुसऱ्याच्या मदतीला केव्हाही, कुठेही, कधीही धावून जात असे. आणि दुसरा म्हणजे त्याला खूप स्वच्छता व टापटिपपणा आवडायचा. त्याने त्याच्या



स्वत:च्या तब्येतीची कधीही काळजी घेतली नाही. तो सतत दुसऱ्याला हसविणारा होता. कधीही न हसणारा अथवा रागीट व्यक्ती जरी त्याच्यासमोर उभा केला तरी तो हसल्याशिवाय राहणार नाही. हसण्यामुळे आपले आयुष्य वाढते आणि रमेश भाऊने सर्वांचे हसवून आयुष्य वाढविले. मात्र त्याच्या अचानक जाण्यामुळे सर्वांचे हसणे बंद झाले.

रमेश भाऊची मुलगी कु.श्रुती हिला मेडिकलला ॲडमिशन मिळाल्यामुळे संपूर्ण वीर परिवार आनंदी झाला होता. ॲडमिशन मिळाल्याचा आनंद त्याचे गगनात मावेना; असा झाला होता. प्रत्येक समाजातील व्यक्तीशी त्याचे संबंध जिव्हाळ्याचे होते. तो गेला यावर कुणाचाच विश्वास बसत नाही. तो दररोज न चुकता श्री कमलाभवानी मातेच्या दर्शनाला जात असे. शिवाय तो खूप धार्मिक होता. त्याला कुठल्याही धार्मिक कार्यात भाग घ्यायला मनापासून आवडायचे.

भूतलावर आलेल्या प्रत्येकाला जायचे आहेच; परंतु असे अवेळी जाणे म्हणजे जन्मोजन्मी मनाला हुरहूर लागण्या-सारखे झाले आहे. आणि क्षणोक्षणी तुझी आठवण येत राहील. तुझाच प्रदीपदादा..!

**...श्री.प्रदीप केशवराव वीर, करमाळा.**

## प्रश्न मंजुषा स्पर्धेत डॉ.भगवंत पवार प्रथम



करमाळा(सं.प्र.) : वडशिवणे येथील सुपुत्र व हैदराबाद येथे एम.बी.बी.एस चे शिक्षण घेत असलेला डॉ.भगवंत पवार याने उत्तरप्रदेश येथे झालेल्या लेबल पीडीयाट्रिक्स (बालरोग शास्त्र) विषयाच्या प्रश्न मंजुषा स्पर्धेतून विभागीय पातळीवर प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्यांची पुढील महिन्यात होणाऱ्या देशपातळीवरील स्पर्धेसाठी देखील निवड झाली आहे. ही स्पर्धा उत्तरप्रदेश मधील कानपूर येथे १२ नोव्हेंबर रोजी पार पडल्या. या परीक्षेसाठी मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश तेलंगणा, उत्तरप्रदेश या पाच राज्यातील विद्यार्थ्यांच्या टीम मधून भगवंतने प्रथम क्रमांक मिळविला आहे. भगवंत हा हैदराबाद येथील एम्स कॉलेजचा विद्यार्थी असून तो तिथे एम.बी.बी.एस चे शिक्षण घेत आहे. त्याने मागील महिन्यात तेलंगणा राज्यात झालेल्या राज्यस्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत त्याने प्रथम क्रमांक मिळवला होता. त्यानंतर त्याची उत्तर प्रदेश येथील विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.




आपल्या लाडक्या
मुला-मुलींच्या वाढदिवसानिमित्त
आकर्षक रिमोट कंट्रोल इलेक्ट्रीक थार (जीप) भेट द्या !
आजच आपली गाडी बुकींग करून डिस्काउंटचा लाभ घ्या !
पत्ता : श्रीराम मंदिर शेजारी, वेताळपेठ, करमाळा.
(9822058106, 7798307085)

## अखिल भारतीय क्षत्रिय महासभेचा दिग्विजय बागल यांना पाठींबा



करमाळा(सं.प्र.): करमाळा - माढा विधानसभा मतदारसंघातील शिवसेना महायुतीचे अधिकृत उमेदवार दिग्विजय दिगंबरराव बागल यांना अखिल भारतीय क्षत्रिय महासभेने भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा रश्मी बागल यांच्या मुख्य उपस्थितीत जाहीर पाठींबा दिला आहे. याबद्दल प्रदेश अध्यक्ष राजेंद्रसिंह राजपुत, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष बादलसिंह ठाकूर, जिल्हाध्यक्ष किशनसिंह राजपूत, पंढरपूर शहराध्यक्ष रविंद्रसिंह ठाकूर, सचिव दिपकसिंह चंदेले, खजिनदार विजयसिंह राजपूत यांनी मन:पूर्वक आभार व्यक्त केले.

### दिव्यांग क्रांती संघटनेचा पाठींबा

दिव्यांग क्रांती संघटनेने शिवसेना महायुतीचे उमेदवार दिग्विजय दिगंबरराव बागल यांना जाहीर पाठींबा दिला आहे. सर्व दिव्यांग बांधव दिग्विजय बागल यांच्या पाठीशी खंबीर उभे असून बागल कुटूंबाशी आमचे जिव्हाळ्याचे संबंध आहेत आणि दिग्विजय बागल यांना आमदार करण्यासाठी आम्ही सर्वोतोपरी सहकार्य करू; असा विश्वास व्यक्त केला. संघटनेने अधिकृत पत्र देऊन पाठींबा दिलेला आहे. याप्रसंगी दिव्यांग क्रांती संघटनेचे म.रा.संस्थापक अध्यक्ष विजय कुलकर्णी, महाराष्ट्र अध्ययक्ष प्रदीप कामटे, उपाध्यक्ष अल्ताफ काझी, करमाळा तालुका अध्यक्ष अतुल पांडे, तालुका उपाध्यक्ष दिपाली फरांडे, आदी उपस्थित होते.

बागायत जमीन व बंगला विकणे आहे
मांगी येथील साडेसात एकर बागायत जमीन
(तीन बोअर, एक विहिर, चार इंची तळ्यावरून पाईप लाईन)
तसेच सर्व सुविधायुक्त असलेला बायपास रोडलगत हायवे टच असलेला
दोन मजली बंगला योग्य किंमत आल्यास त्वरीत विकणे आहे
संपर्क : मो.7709350035

फायदेशीर गुंतवणूक

आजच आपल्या भविष्यासाठी गुंतवणूक करा व सोबत

**टुणवाल कंपनीची इलेक्ट्रिक स्कुटर गिफ्ट मिळवा**

# संस्कार सिटी फेज २

धर्मसंगीत लॉन्स शेजारी, करमाळा-कर्जत रोड

किंमत 3,51,000.00/- 1000 स्क्वे.फुट पासून आजच साईट व्हीजीट करा

त्वरा करा मोजकेच प्लॉट शिल्लक



दसरा दिवाळी निमित्त आकर्षक ऑफर



४ एकरचा भव्य टाऊनशिप प्रकल्प

प्लॉट्स बुकींग सुरू आहे

- सुरूवातीला २१ प्लॉट बुकींग करणाऱ्यांस टूनवाल कंपनीची इलेक्ट्रीक स्कुटर फ्री
- अतिशय वाजवी दरामध्ये संपूर्ण वास्तुशास्त्रानूसार ७५० ते १५०० स्क्वे.फुट प्लॉट्स उपलब्ध
- क्लिअर टायटल एन.ए.प्लॉट्स। स्वतंत्र सातबारा उतारा
- प्रशस्त अंतर्गत ३० व ४० फुटी रस्ते
- अद्ययावत अंडरग्राउंड ड्रेनेज लाईन
- स्ट्रीट लाईट्स व भव्य आकर्षक प्रवेशद्वार
- रस्त्याच्या दुतर्फी हिरवीगार झाडी
- गार्डन सभोवताली कंपाऊंड व झाडी

**आतार डेव्हलपर्स**
फंडगल्ली, करमाळा., जि.सोलापूर

बुकींगसाठी संपर्क
जावेद आतार (9423334210)
मुन्नाभाई काझी (9881089582)



२२ नोव्हेंबर २०२४

# ५ वा स्मृतीदिन

दु:खाचा डोंगर कोसळलेला असो, की..
सुखाचा वर्षाव होत असो,
मनाला चिंतेचे ग्रहण लागलेले असो, की..
आठवणीचे तारे लुकलुकत असो,
आठवते ती फक्त. **आई**

सेवानिवृत्त मुख्याध्यापिका

**सौ.रामकुंवर मुरलीधर अब्दुले**

यांच्या ५ व्या स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या स्मृतीस..

**विनम्र अभिवादन !**

अभिवादक

**अब्दुले आणि कांबळे परिवार**
करमाळा., जि.सोलापूर